विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत "मत्स्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व उपजिविका साधन उपलब्ध करून देणे" या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र.९६/का-१९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: १८/ ०९/२०१९

संदर्भ-

१. जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०३(१३)/२०१४-SGII, दि.०९/०२/२०१५.
२. शासन निर्णय क्रमांक: केंद्रीय २०१४/प्र.क्र.७८/का-१९ , दि.१७.०३.२०१५ व दि.२८.०३.२०१५
३. NORID संस्थेने दि.१३.०८.२०१९ च्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव.

प्रस्तावना -

केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान , भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते. सदर योजनेतंर्गत प्राप्त निधीमधून आदिवासी जनतेसाठी रोजगारनिर्मिती,उत्पन्नवाढ , शिक्षण व आरोग्यासाठी योजना राबविण्यात येतात. केंद्र शासनाकडून संदर्भाधिन पत्रान्वये विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत Cage fishery अंतर्गत प्राप्त निधी आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांना संदर्भाधिन शासन निर्णय क्र.२ अन्वये वितरित करण्यात आलेला आहे.

२ केंद्र शासनाच्या राष्ट्रीय मत्स्यजिवी सहकारी संघ (FISHCOPFED) ची NORID ही सहयोगी संस्था आहे . "NORID" संस्थेमार्फत देशभरातील आदिवासी व ग्रामीण भागात मत्स्यव्यवसाय, वनसंरक्षण, शेती व्यवसाय, पशुपालन क्षेत्रात विकासाचे विविध कार्यक्रम FISHCOPFED संस्थेच्या सहयोगाने राबवित आहे."NORID"संस्थेमार्फत आदिवासी लाभार्थ्यांना मत्स्यशेतीद्वारे स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण मत्स्यव्यवसाय तज्ञांमार्फत देण्यात येत आहे.

३. आदिवासी युवकांना रोजगारनिर्मितीसाठी विविध साधने उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमांतर्गत NORID संस्थेने आदिवासी ग्रामीण लोकांना मासेमारीद्वारे स्वयंरोजगार व उपजिविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी पालघर, गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येकी १०० याप्रमाणे एकूण ३०० लाभार्थ्यांसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. सबब, भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत Cage

fishery करिता प्राप्त निधीमधून NORID या संस्थेमार्फत पालघर,गोंदिया व गडचिरोली या आदिवासी बहुल जिल्ह्यातील ३०० आदिवासी कुटुंबाना मासेमारी प्रशिक्षण व साधन संच (Fishing Kit) पुरवुन स्वावलंबी बनविणे ही योजना राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय-

मत्स्यव्यवसाय क्षेत्रात आदिवासी लोकांना प्रशिक्षण व साधन संच (Fishing Kit) द्वारे रोजगार मिळवून देणे कार्यक्रमार्तंगत "मत्स्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व उपजिविका साधन उपलब्ध करून देणे ही योजना NORID व आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु. ६६ लक्ष किंमतीच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेचे या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही शासनातर्फे आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८२०१६४०२१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.09.21 13:24:42 +05'30'

(संतोष जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव,आदिवासी विकास यांचे स्वीय सहायक मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५. सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे,नागपूर
८. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू,देवरी व अहेरी
९. प्रतिनिधी , NORID संस्था
१०. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
११. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई

विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत मंजूर योजना

परिशिष्ट-१

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नाव</td><td>“मत्स्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व उपजिविका साधन उपलब्ध करून देणे</td></tr>
<tr><td>२.</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>पालघर,गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येकी १०० प्रमाणे ३०० लाभार्थी</td></tr>
<tr><td>३.</td><td>वित्तीय तरतूद</td><td>सन २०१४-१५ करिता विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत मंजुर योजना - Cage fishery करिता प्राप्त निधी</td></tr>
<tr><td>४.</td><td>या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक</td><td>
एकूण खर्च -रु. ६६.०० लक्ष .
१. प्रती लाभार्थी खर्च-
<table>
<tr><th>अ.नं</th><th>बाब</th><th>संख्या</th><th>प्रति वस्तू किंमत (रुपये) (GST सहित)</th><th>एकूण खर्च (रुपये)</th></tr>
<tr><td>१</td><td>ओढ जाळे (Drag net)</td><td>१</td><td>८,०००/-</td><td>८,०००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>फसली जाळे (Gill net)</td><td>२</td><td>२,५००/-</td><td>५,०००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>फेक जाळे (Cast net)</td><td>२</td><td>१,५००/-</td><td>३,०००/-</td></tr>
<tr><td>४</td><td>नायलॉन हप्पा</td><td>१</td><td>१,०००/-</td><td>१,०००/-</td></tr>
<tr><td>५</td><td>हातजाळे (Collection handnet)</td><td>२</td><td>५००/-</td><td>१,०००/-</td></tr>
<tr><td>६</td><td>स्प्रिंग तराजु (१० Kg)</td><td>१</td><td>५००/-</td><td>५००/-</td></tr>
<tr><td>७</td><td>प्लास्टिक क्रेट (१० Kg)</td><td>१</td><td>५००/-</td><td>५००/-</td></tr>
<tr><td>८</td><td>जाळे दुरूस्तीसाठी सुई व नायलॉन धाग्याचे बंडल</td><td>१</td><td>१,०००/-</td><td>१,०००/-</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>एकूण</td><td>२०,०००/-</td></tr>
</table>
आकस्मिक खर्च-
१) प्रत्येक जिल्ह्यातील जलस्त्रोतांची निवड करणे व जलस्त्रोताच्या भोवताली असलेल्या पात्र १०० लाभार्थी कुटुंबांची निवड करणे - रू.१,००,०००/-
२) अंमलबजावणी संस्थेस प्रशासकीय व वाहतुक खर्च - रू.१,००,०००/-
प्रति जिल्हा (१०० लाभार्थी) एकूण खर्च = निश्चित भांडवल + आकस्मिक खर्च
= २०,००,००० + २,००,०००
= २२,००,०००/- (रू.२२ लक्ष)
३ जिल्ह्यांसाठी (३०० लाभार्थी) एकूण खर्च - रू.२२ लक्ष * ३ = रू.६६ लक्ष
संस्थेमार्फत सर्व लाभार्थ्यांना मत्स्यव्यवसायाचे व अत्याधुनिक साधनसंच वापराचे विनामुल्य प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.
(सर्व प्रकारचे कर अंमल बजावणी यंत्रणेकडून भरण्यात येतील)
</td></tr>
</table>

५.	**योजना राबवणारी यंत्रणा**	NORID संस्था व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,डहाणू,देवरी व अहेरी
६.	**नियंत्रक अधिकारी**	अपर आयुक्त ,आदिवासी विकास,ठाणे व नागपूर
७	**योजनेचा उद्देश/ हेतु**	१) पालघर, गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाना स्वयंरोजगार व उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन,तयार मासेमारी साधनांचा संच मोफत उपलब्ध करुन दिल्यास या निवड केलेल्या लाभार्थी कुटुंबांना, मासेमारी साधने वापरुन लहान, मोठ्या तलावात, जलाशयात, नदीमध्ये मासेमारी करुन त्यापासून नियमित रोजगार उपलब्ध होईल. २) या मासेमारी व्यवसायात त्यांना आकृष्ठ करुन प्रोत्साहीत करण्यासाठी निवडलेल्या लाभार्थींना प्रात्यक्षिका सह मासेमारी साधने वापरुन मोठ्या प्रमाणात मासे कसे धरता येतील याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व आदिवासी कुटुंबाला उपजिविकेचे साधन मिळेल. ३) या प्रकल्पांतर्गत आदिवासी कुटुंबाला देण्यात येणारी तयार मासेमारी साधने लहान/मोठे तलाव, जलाशय व नदी नाल्यांमध्ये वापरण्यासाठी व मासे पकडण्यासाठी उपयुक्त आहेत. ओढ जाळे सर्व कुटुंब सदस्य मिळून वापरुन मोठ्या प्रमाणात मासे पकडू शकतील. फसली जाळे वापरुन खोल तलावात ही मासेमारी करणे शक्य होणार आहे. तर फेक जाळे वापरुन महिला देखील लहान तलाव, नदी, नाल्यात मासेमारी करु शकतील. त्यामुळे या प्रकल्पांतर्गत संपूर्ण आदिवासी कुटुंबाला मासे पकडून त्यांची उपजिविका करणे शक्य होईल. ४) मासेमारी साधनांचा पुरवठा करताना ही साधने वापरून, पकडलेली मासळी ही दिर्घकाळ ताजी ठेवण्यासाठी नायलॉन हाप्पा व हातजाळे पुरवठा करण्यात येणार आहे. ही पकडलेली मासळी बाजारात विक्री करण्यासाठी तराजू व प्लॅस्टिक ट्रे देण्यात येणार आहे. आदिवासी कुटुंब आपल्या गरजेपुरते मासे ठेवून उर्वरित मासळी बाजारभावाप्रमाणे विक्री करू शकतील. मासे पकडण्यासोबतच मासे विक्री बाबतचे प्रशिक्षण देखील या कार्यक्रमात देण्यात येणार असल्याने आणि आदिवासी लोकांना एक नवीन साधन स्वयंरोजगारासाठी उपलब्ध होईल. ५) ३०० लाभार्थी कुटुंबांना तयार मासेमारी साधने उपलब्ध करुन त्यांना मासेमारीचे शास्त्रीय प्रशिक्षण देवून मासेमारीच्या व्यवसायाकडे आकर्षित करण्याचा उद्देश असून, संपूर्ण आदिवासी कुटुंबाला उत्पन्नाचा रोजगारांचा एक नविन स्त्रोत उपलब्ध होईल व त्याचा लाभ पालघर, गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यातील ३०० आदिवासी कुटुंबाना होईल.
८	**योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती**	प्रकल्प अधिकारी यांनी NORID यांच्या तांत्रिक सहकार्याने ही योजना राबवायची आहे. योजना राबविताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात. १) NORID संस्था FISHCOPFED या केंद्र शासन संस्थेची सहयोगी संस्था आहे व मत्स्यव्यवसाय क्षेत्राशी निगडीत संस्था असल्याने या योजनेच्या उद्दीष्टा प्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात उपयुक्त जलस्त्रोत निवडणे ही जबाबदारी मध्यवर्ती संस्था NORID यांची राहील.

		२) जलस्त्रोतामध्ये लहान, मध्यम स्वरुपाचे जलाशय, पेसा अंतर्गत येणारे तसेच वनविभागाचे एफआरए २००६ अंतर्गत येणारे तलाव, गाव तलाव, नैसर्गिक नद्या, नाले यांचा समावेश असेल. ग्रामपंचायतीच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या जलस्त्रोतांना प्राधान्य देण्यात यावे. ३) सदरची योजना पालघर, गोंदिया व गडचिरोली या जिल्ह्यात राबविण्यात येणार असल्याने आदिम आदिवासीचे प्राबल्य असलेल्या ठिकाणांची प्राथम्याने निवड करावी. शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर २ महिन्यांच्या कालावधीत जलस्त्रोत निवडणे व उद्दिष्टाप्रमाणे लाभार्थी आदिवासी कुटुंबाची निवड करणे आवश्यक आहे. किमान ८ ते १० महिने पाणी टिकून राहणाऱ्या तलावांची निवड करावी. ४) या प्रकल्पासाठी प्रत्येक जिल्ह्यात उपयुक्त मासेमारी जलस्त्रोत निवडून प्रत्येक जिल्ह्यात १०० आदिवासी लाभार्थी कुटुंबे निवडण्याची जबाबदारी NORID या संस्थेची राहिल. ५) लाभार्थी निवड करताना उपलब्ध असल्यास आदिम जमातीच्या कुटुंबाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. या प्रकल्पांतर्गत आदिवासी लाभार्थी निवडीसाठी प्रकल्प अधिकारी आ. वि. प्रकल्प यांनी NORID संस्थेस सर्वतोपरी सहाय्य करावे. तसेच निवड केलेल्या लाभार्थी आदिवासी व आदिम आदिवासी प्रवर्गातील आहेत याची खातरजमा संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी करावी. ६) मासेमारी साठी प्रत्येक जिल्ह्यात उपयुक्त जलस्त्रोत निवडणे व प्रत्येक जिल्ह्यात १०० आदिवासी लाभार्थींची निवड पूर्ण झाल्यानंतर याबाबत शहनिशा व खातरजमा करुन या योजनेच्या अंमलबजावणीसाठी वितरित केलेल्या निधीपैकी ५० टक्के निधीचे वाटप संबंधीत प्रकल्प अधिकारी NORID संस्थेस करतील. ७) निवड केलेल्या लाभार्थींना (कुटुंबास) निवड केलेल्या जलाशयात मासेमारी करण्यासाठी प्रतिबंध होवू नये त्यांना मासेमारी करण्यासाठी मुभा असावी यासाठी प्रकल्प अधिकारी ए.आ.वि. प्रकल्प हे विशेष मासेमारी परवाना स्वत: स्वाक्षरी करुन देतील. या परवान्यावर तलाव, जालशयाचे मासेमारी हक्क ज्या शासकीय यंत्रणेकडे असतील (उदा. ग्रामपंचायत, पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद इ.) त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या प्रति स्वाक्ष-या घेऊन कुटुंब प्रमुखाच्या नावाने देण्यात येईल व परवाना पत्रात कुटुंबातील इतर सदस्यांची नावे व तपशिल अंतर्भुत असेल (परिशिष्ट क्र.२) प्रमाणे मासेमारी परवाना देण्यात यावा. ८) सदरचा मासेमारी परवान्यासाठी आवश्यक माहिती NORID संस्थेने विहित नमुन्यात भरून प्रकल्प अधिकारी यांचेकडे सादर करावी. प्रकल्प अधिकारी ए.आ.वि. प्रकल्प यांनी या परवाना पत्रावर स्वाक्षरी करून तलावांशी संबंधीत मासेमारी हक्कदार विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या प्रतिस्वाक्षऱ्या घेवून परवाना अदा करावा. ९) सदरचा मासेमारी परवाना निर्गमित तारखेपासून पुढील ३ वर्षासाठी विधीग्राह्य राहिल. तसे परवान्यात स्पष्ट पणे नमूद करावे. १०) या योजनेअंतर्गत ५० टक्के निधी NORID संस्थेस अदा केल्यानंतर सदर

		संस्था निवड केलेल्या लाभार्थ्यांना मासेमारीची ठिकाणे तलाव, नदी, जलाशय इ. ठिकाणी लाभार्थीसह भेट देवून मासेमारी करण्याबाबतचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके सादर करतील. ११) योजनेच्या अंमल बजावणीसाठी संबंधित संस्थेने शिफारस केल्यानुसार प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांना मोफत द्यावयाच्या तयार मासेमारी साधनाचा संच विहित केलेल्या मोजमापे व गुणवत्तेनुसार खरेदी करण्याची व लाभार्थ्यांना पुरवठा करण्याची जबाबदारी NORID संस्थेची राहिल. सदरचे साहित्य विहित मानकानुसार व मोजमापांप्रमाणे बरोबर आहे याबाबतची खातरजमा प्रकल्प अधिकारी ए.आ.वि. यांनी करावी. निवड केलेल्या लाभार्थी कुटुंबाना तयार मासेमारी साधनांचा संचाचे वाटप प्रकल्प अधिकारी ए.आ.वि. प्रकल्प यांचे अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचेसमोर करण्यात यावे. याबाबतची छायाचित्रे काढुन ती जतन करण्यात येतील.यापुर्वी दिलेल्या ५० टक्के निधीचे विनियोग प्रमाणपत्र संस्थेकडून प्राप्त झाल्यानंतर उर्वरित ४० टक्के निधी संस्थेस अदा करण्यात यावा. १२) योजना कार्यान्वित झाल्यानंतर व मासेमारी साधनांचा संच वाटप लाभार्थी कुटुंबाला झाल्यानंतर योजनेची फल निष्पत्ती बाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि. प्रकल्प यांनी वा प्रतिनिधींनी NORID संस्थेसोबत संयुक्त दौरा करून पाहणी करावी व नियंत्रक अधिकारी यांना अहवाल सादर करावा. १३.सदरचा अहवाल शासनास सादर झाल्यानंतर या योजनेअंतर्गत मंजूर उर्वरित १० टक्के निधीचे वितरण NORID संस्थेत करण्यात यावे.
९	**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापन, पर्यवेक्षण**	**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापनकरीता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे** १) संबंधित अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग - अध्यक्ष २) FISHCOPFED या केंन्द्रीय शासनाच्या संस्थेचा प्रतिनिधी (मत्स्यव्यवसाय तज्ञ) - सदस्य ३) NORID संस्थेचा प्रतिनिधी - सदस्य ४) संबंधित सहाय्यक आयुक्त,मत्स्यव्यवसाय (तांत्रिक)- सदस्य ५) संबंधित प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्रकल्प - सदस्य सचिव सदर योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रीयेमध्ये काही बदल किंवा सुधारणा करण्याचे अधिकार उपरोक्त समितीस राहतील. ➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक २ महीन्यांनी आयोजित करावी (प्रत्येक टप्पा पूर्ण झाल्या नंतर) व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याच्या निराकरणाबाबत आवश्यक कार्यवाही करावी.
१०	**योजनेची अंमलबजावणीचा कालावधी**	संस्थेला निधीचा प्रथम हफ्ता वितरित झाल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या आत योजना कार्यान्वित करणे बंधनकारक राहील .

<table>
<tr>
<td>११</td>
<td>योजनेच्या अटी व शर्ती</td>
<td>१) योजना विहीत वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल.
१) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊटसोर्सिंगची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल.
२) प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना प्रकल्प अधिकारी व सनियंत्रण व मूल्यमापन समितीला देऊन समितीच्या मान्यतेनेच बदल करावा.
३) प्रकल्प राबवितांना आवश्यक असणारे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके संस्थेद्वारे देणे बंधनकारक असेल.
४) योजनेच्या प्रगतीबाबत माहिती वेळोवेळी प्रकल्प अधिकाऱ्यांना तसेच शासनास सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील .
५) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
६) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs व योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल.</td>
</tr>
<tr>
<td>१२</td>
<td>निधी वितरणाची कार्य पद्धती</td>
<td>१) प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्यामार्फत विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत Cage Fishery अंतर्गत प्राप्त निधी सदर योजनेसाठी वापरण्यात येईल.
२. संबंधित अपर आयुक्त,आदिवासी विकास हे आवश्यकता असल्यास अतिरिक्त निधी प्रकल्प अधिकारी यांना वर्ग करतील.
३. सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत NORID या अंमलबजावणी यंत्रणेस खालीलप्रमाणे वितरित करण्यात येईल .
<table>
<tr><th>टप्पा क्र.</th><th>कार्यवाही</th><th>वितरित निधीची टक्केवारी</th><th>रक्कम (लक्ष)</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रत्येक जिल्ह्यात उपयुक्त जलस्त्रोताची निवड व १०० आदिवासी लाभार्थीची निवड पुर्ण झाल्यानंतर</td><td>५० %</td><td>११.००</td></tr>
<tr><td>२</td><td>विहीत मानंकनानुसार प्रकल्पांतर्गत लाभार्थी कुटुंबांना मोफत द्यावयाच्या मासेमारी साधनांचे संचाचे वाटप व प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर तसेच प्रथम ५० % निधी खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र संस्थेने सादर केल्यानंतर</td><td>४०%</td><td>८.८०</td></tr>
<tr><td>३</td><td>संस्थेने फलनिष्पत्ती अहवाल सादर केल्यानंतर व</td><td>१०%</td><td>२.२०</td></tr>
</table>
</td>
</tr>
</table>

			प्रकल्प मुल्यमापन समितीने सदर प्रकल्प पूर्ण झाल्याचे प्रमाणित केल्यावर		
			एकूण	**१०० %**	**२२.००**
१३	**योजनेची फलनिष्पत्ती**	१) मत्स्योत्पादनात व स्थानिक आदिवासी लोकांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. २) मोठ्या प्रमाणावर आदिवासी क्षेत्रात रोजगारनिर्मिती. ३) मत्स्योत्पादनाबाबत प्रशिक्षण ,प्रात्यक्षिक,शैक्षणिक सहली, तांत्रिक बाबींची माहिती मुळे कौशल्य विकास होईल. ४) प्रथिनयुक्त सकस अन्न पुरवठ्याने कुपोषणावर मात करता येईल.			